॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ४ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेतील गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी स्वर्गीय प्रवीण देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या 'प्रोग्रामर ऑफ द फ्युचर २०२५-२६' या शिष्यवृत्ती योजनेंतर्गत तीन विद्यार्थ्यांना प्रत्येकी १० हजार रुपयांचे धनादेश मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

यावेळी मंचावर प्रा. एस. आर. कोल्हे, प्रा. आर. पी. भावसार, सायबर सुरक्षा जागरूकता कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. राजू आमले तसेच सायबर सुरक्षा क्लबच्या अध्यक्षा जान्हवी सपकाळे उपस्थित होते.

स्वर्गीय प्रवीण देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे यांनी विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी या शिष्यवृत्तीचे प्रायोजकत्व स्वीकारले असून, सन २०२५-२६ पासून या योजनेची सुरुवात करण्यात आली आहे. गुणवंत तसेच आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया दि. २० जून २०२६ रोजी संगणकशास्त्र प्रशाळेत दुपारी २ ते ५ या वेळेत पार पडली. त्यानंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांना दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजित सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमात कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते प्रत्येकी १० हजार रुपयांचे धनादेश प्रदान करण्यात आले.

शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांमध्ये विशाल सोनोने (एम.सी.ए.), पंकज बारी (एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स) आणि कु. निर्मल पाटील (एम.एस्सी. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) यांचा समावेश आहे. या कार्यक्रमास संगणकशास्त्र प्रशाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**बातमी क्रमांक २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. ४ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या इंडक्शन प्रोग्रामची सुरुवात दि. २ सप्टेंबर रोजी आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेच्या संचालक डॉ. मनिषा इंदानी यांच्या व्याख्यानाने झाली.

'जीवन कौशल्ये' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. इंदानी म्हणाल्या की, शिक्षण हे कौशल्याधिष्ठित असणे आवश्यक आहे. शिक्षणाला कलेची आणि कौशल्यांची जोड मिळाल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही ना काही कला व क्षमता असतात. त्यांना योग्य दिशा देऊन त्यावर कौशल्य प्राप्त करता येते. कौशल्यामुळे मनुष्याला श्रेष्ठत्व प्राप्त होते. कमी श्रम, कमी खर्च आणि कमी वेळेत उत्कृष्ट परिणाम साध्य करण्याची क्षमता म्हणजे कौशल्य होय, असे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय मनोगतात भाषा प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे विद्यार्थ्यांनी स्वतःला 'प्रेझेंटेबल' कसे ठेवावे, याबाबत मार्गदर्शन केले. कौशल्ये विकत घेता येत नाहीत, तर ती अनुभवातून संपादित केली जातात. आपल्यातील वैशिष्ट्य ओळखून त्याला विकसित करणे म्हणजेच कौशल्य होय, असे ते म्हणाले. विवेकी बुद्धीने काम केल्यास विविध कौशल्ये आत्मसात करता येतात. निसर्गातील प्रत्येक घटकाकडून काही ना काही शिकता येते. विद्यार्थ्यांनी स्वतःमधील कौशल्य ओळखून त्याचा विकास करण्याबरोबरच सजग राहून चिंतन व मनन करण्याची सवय लावून घ्यावी, असे आवाहनही प्रा. डॉ. पगारे यांनी केले.

यावेळी भाषा अभ्यास प्रशाळेतील हिंदी विभागाचे अध्यक्ष प्रा. सुनील कुलकर्णी, मराठी विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. दीपक खरात, इंग्रजी विभागाच्या प्रा. प्रतिभा गलवाडे, सहयोगी शिक्षक प्रीती मनुचारी, निखिल तायडे, महेश सूर्यवंशी, संशोधक विद्यार्थी खेमराज पाटील, सुकन्या जाधव, शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रशाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रीती सोनी तर आभार डॉ. सुदर्शन भवरे यांनी मानले.

**बातमी क्र. ३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. ४ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी, अपेक्षा तसेच विविध प्रश्न जाणून घेण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी 'कुलगुरू-विद्यार्थी संवाद' या उपक्रमांतर्गत गणितशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला.

यावेळी गणितशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. किशोर पवार, प्रा. आर. एल. शिंदे, प्रा. एच. एल. तिडके, प्रा. कीर्ती कमलजा यांच्यासह शिक्षक व तसेच विद्यापीठातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी विविध शाखेतील प्रवेशित विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या शैक्षणिक अडचणी, समस्या व अपेक्षा जाणून घेतल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासक्रमाशी संबंधित तसेच शैक्षणिक आणि विद्यापीठाशी निगडित विविध प्रश्न यावेळी मांडले. विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करून बदलत्या काळातील ज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या संधींचा प्रभावीपणे उपयोग करावा, असे मार्गदर्शन कुलगुरूंनी केले.

यावेळी कुलगुरूंनी संशोधक विद्यार्थ्यांशी स्वतंत्रपणे संवाद साधून त्यांच्या संशोधन कार्याची माहिती घेतली. संशोधन करताना नावीन्यपूर्ण विषयांची निवड, वैज्ञानिक दृष्टिकोन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि समाजोपयोगी संशोधनाला प्राधान्य देण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

'कुलगुरू-विद्यार्थी संवाद' उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना थेट कुलगुरूंशी संवाद साधून आपल्या अडचणी व अपेक्षा मांडण्याची संधी मिळत असून, विद्यापीठ प्रशासन आणि विद्यार्थी यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होण्यास मदत होत आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ४ सप्टेंबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता